दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २९८ वा | गुरुवार दि. २४ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## प्रदीप शर्मा यांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा



**मुंबई ।** व्यापारी मनसुख हिरेन हत्या प्रकरण आणि अँटिलिया बॉम्ब प्रकरणी अटकेत असलेले माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना सर्वोच्च न्यायालयानं बुधवारी (२३ ऑगस्ट) जामीन मंजूर केला आहे. याआधी मुंबई हायकोर्टानं प्रदीप शर्मा यांना जामीन नाकारला होता. त्यानंतर शर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर सर्वोच्च न्यायालयानं माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना सर्वोच्च न्यायालयानं मोठा दिलासा देत नियमित जामीन मंजूर केला आहे.

## न्यूज कॉलम

### महसूलच्या पथकावर ट्रॅक्टरने हल्ला

**धुळे ।** साक्री बायपासजवळील अंबापूर मार्गावरमहसूलच्या पथकाने अवैधपणे मुरूम वाहतूक करणाऱ्या विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरला पकडले. चालकाकडे मुरूम वाहतुकीचा कुठल्याही प्रकारचा परवाना आढळला नाही. त्यामुळे पथकाने ट्रॅक्टर साक्री तहसील कार्यालयात नेण्यास चालकाने सांगितले. तेव्हा चालकाने ट्रॅक्टरसह पळण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान पथकातील कर्मचाऱ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करीत ट्रॅक्टर पळवून नेला. ट्रॅक्टरचालक तसेच मालक कैलास मारनर (रा. काशीपूर, ता. साक्री) यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

### वरूळ गावात तरुणावर चाकूने हल्ला

**धुळे ।** बॅन्डवर सुरू असलेले गाणे बदलण्यासाठी सहकार्याशी वाद घालत असल्याने त्याचा जाब विचारल्याच्या रागातून विशाल राजेंद्र पाटील यास गावातील योगेश पप्पू सोनवणे व विशाल रवींद्र शिंदे याने शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच ठार करण्याची धमकी दिली. योगेश सोनवणे याने खिशातून चाकूसदृश हत्यार काढत उजव्या डोक्याजवळ वार करत जखमी केले.

# अभिमानास्पद! भारताचा ‘चंद्रस्पर्श’

## भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा जगातील पहिला देश..!

## चांद्रयान मोहिमेत महाराष्ट्राचा खारीचा वाटा





**मुंबई । प्रतिनिधी**

चांद्रयान-३ च्या लँडरने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाऊल ठेवून इतिहास रचला आहे. याने चंद्राच्या अंतिम कक्षेपासून २५ किमीचा प्रवास ३० मिनिटांत पूर्ण केला. लँडर हळूहळू खाली उतरवण्यात आले. ५ वाजून ३० मिनिटांनी सुरुवातीला रफ लँडिंग खूप चांगली झाली. यानंतर लँडरने ५ वाजून ४० मिनीटांनी लॅण्डरने व्हर्टिकल लँडिंग केले. तेव्हा त्याचे चंद्रापासूनचे अंतर ३ किमी होते.

अखेर लँडरने सहा वाजून चार मिनिटांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. अशा प्रकारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. चंद्राच्या कोणत्याही भागात वाहन उतरवणारा हा चौथा देश ठरला आहे. यापूर्वी केवळ अमेरिका, सोव्हिएत युनियन आणि चीनने हे यश मिळवले आहे. आता सर्वजण विक्रम लँडरमधून प्रज्ञान रोव्हर बाहेर येण्याची वाट पाहत आहेत. धूळ स्थिरावल्यानंतर ते बाहेर येईल. विक्रम आणि प्रज्ञान एकमेकांचे फोटो काढून पृथ्वीवर पाठवतील. हा विक्रम रशियाच्या नावावर झाला असता, भारतापूर्वी रशिया चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवणार होता. हे लँडिंग २१ ऑगस्ट रोजी होणार होते, परंतु शेवटची कक्षा बदलताना ते मार्गापासून दूर गेले आणि चंद्राच्या पृष्ठभागावर कोसळले. चांद्रयान-३ आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून १४ जुलै रोजी ३.३५ वाजता प्रक्षेपित करण्यात आले होते. चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्यासाठी ४१ दिवस लागले. पृथ्वीपासून चंद्राचे एकूण अंतर ३ लाख ८४ हजार किलोमीटर आहे.

### लँडिंगनंतर आता काय होणार?

धूळ ओसरल्यानंतर विक्रम सुरू होईल आणि कम्युनिकेट करेल. त्यानंतर रॅम्प उघडेल आणि प्रज्ञान रोव्हर रॅम्पवरून चंद्राच्या पृष्ठभागावर येईल रोव्हरची चाके चंद्राच्या मातीवर अशोक स्तंभ आणि इस्त्रोच्या लोगोची छाप सोडतील. विक्रम लँडर प्रज्ञानचा आणि प्रज्ञान रोव्हर विक्रमचा फोटो काढतील. ते हे फोटो पृथ्वीवर पाठवतील.

### भारताने पुन्हा एकदा इतिहास रचला

चंद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण पृष्ठभागावर यशस्वीपणे उतरवत भारताने पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. चंद्राच्या दक्षिण पृष्ठभागावर यशस्वीपणे यान उतरविणारा भारत जगातील पहिला देश ठरला आहे. इस्त्रोचे प्रमुख एस. सोमनाथ, सर्व शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि ही मोहीम यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येकाचे मन:पूर्वक अभिनंदन!



### इतिहास डोळ्यासमोर घडताना पाहिल्यावर अभिमान वाटतो

चांद्रयान ३ ने बुधवारी संध्याकाळी ६:०४ वाजता चंद्रावर यशस्वी लँडिंग केले. पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील जोहान्सबर्गमधून लाइव्ह स्ट्रिमिंगद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले. तेथून त्यांनी देशाला संबोधित केले. पीएम मोदी म्हणाले-अशा ऐतिहासिक घटना देशाच्या जीवनाचे चैतन्य बनतात. हा क्षण अविस्मरणीय आहे. हा क्षण अभूतपूर्व आहे. विकसित भारताच्या शंखनादाचा हा क्षण आहे. नव्या भारताचा जयघोष करण्याचा हा क्षण आहे. पंतप्रधान म्हणाले की, प्रत्येक देशवासियांप्रमाणे माझेही लक्ष चांद्रयान महाअभियानावर आहे. मी माझ्या देशबांधवांशी आणि माझ्या कुटुंबियांशीही या उत्साह आणि आनंदात सहभागी आहे. भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचला आहे, जिथे आजपर्यंत कोणताही देश पोहोचला नाही.

अवघ्या जगाचे लक्ष वेधलेल्या ‘चंद्रयान-३’ चे यशस्वीपणे चंद्रावर लँडिंग झाले. या मोहिमेत सहभागी इस्त्रोच्या सर्व शास्त्रज्ञांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. भारताने स्वत:ला पुन्हा एकदा सिद्ध केले असून जागतिक पातळीवर नवा इतिहास रचला आहे. या मोहीम यशस्वितेसाठी हजारो हात राबले तेव्हा आपण हा दिवस पाहू शकलो. हे यश खूप मोठे आहे, जगाला हेवा वाटेल असे कार्य आपल्या वैज्ञानिकांनी केले आहे. वैज्ञानिक क्षेत्रात अशीच प्रगती होत राहो ही परमेश्वराचरणी प्रार्थना.

– **दादाजी भुसे,** पालकमंत्री नाशिक

समस्त भारतीयांसाठी हा अभिमानाचा क्षण असून या निमित्ताने आपल्या देशाने विज्ञान क्षेत्रातील एका नव्या पर्वाकडे दमदार पाऊल टाकले आहे. भारताचे हे यश जागतिक पटलावर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताचा दबदबा वाढविणारे ठरणार आहे. या नव्या पर्वाचे स्वागत करूया. उत्तरोत्तर भारताने अशीच प्रगती करावी, याच सदिच्छा! – **छगन भुजबळ,**
मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

### जुन्नरच्या २ सुपुत्रांची महत्त्वपूर्ण कामगिरी

जुन्नरच्या २ सुपुत्रांची चांद्रयान-३ मोहिमेत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. असिफभाई महालदार हे उद्योजक आहेत. त्यांची रिलायन्स फायर सिस्टीम नामक कंपनी आहे. त्यांच्या कंपनीला या मोहिमेसाठी ६ कोटींचे कंत्राट मिळाले. ते जुन्नरच्या राजुरीत राहतात. चांद्रयान मोहिमेत काही धोका उद्भवला तर मोठी आग लागण्याची शक्यता असते. त्यामुळे खबरदारीस्तव मोठी यंत्रणा सूसज्ज ठेवावी लागते. ही अग्निशामक यंत्रणा असिफभाई महालदार यांच्या रिलायन्स फायर सिस्टीमने इस्त्रोला पुरवली होती. ही यंत्रणा प्रक्षेपण स्थळी म्हणजे श्रीहरिकोटा येथे लावण्यात आली होती. राजुरी गावातील मयुरेश शेटे इस्त्रोत शास्त्रज्ञ आहेत. त्यांचाही चांद्रयान मोहिमेत सहभाग आहे. ते सीनिअर सायंटिस्ट इस्त्रोत कार्यरत आहेत. त्यांचे वडील राजुरीत प्राचार्य आहेत. मयुरेश यांचे प्राथमिक शिक्षण राजुरीतील शिक्षण विद्या विकास मंदिर येथे झाले आहे.

## चांद्रयान मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सतिष महालेंचे एकविरा मातेस साकडे



**धुळे । प्रतिनिधी**

भारताचे चांद्रयान-३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरली. या पार्श्वभूमीवर सदर चांद्रयान मोहिम यशस्वीरित्या पार पडावी व जगात भारताची प्रतिमा उजळावी या हेतूने शिवसेना शिंदे गटातर्फे खान्देश कुलस्वामिनी आई एकविरा मंदिरात सतिष महाले यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी ‘आई एकवीरा...भारताची चांद्रयान मोहिम यशस्वी होवू दे‘ असे साकडे सतिष महाले यांनी देवीला घातले.

याबाबत माहिती देतांना सतिष महाले यांनी सांगितले की, १४ जुलै २०२३ रोजी दुपारी २.३५ वाजता आंध्र प्रदेशच्या श्रीहरिकोटा सतिष धवन स्पेस सेंटरमधून चांद्रयान-३ लाँच झाले. देशाचा हा तिसरा प्रयत्न आहे. आता यात कसल्याही प्रकारचे विघ्न, तांत्रिक बिघाड होवू नये, देशाच्या शास्त्रज्ञांसह तमाम भारतीयांनी बघितलेले स्वप्न पुर्ण व्हावे व यान यशस्वीरित्या चंद्राच्या पृष्ठभुमिवर उतरावे, याकरीता खान्देश कुलस्वामिनी आई एकविरा देवी मंदिरात महाआरती केली व देवीला साकडे घातले. हे अभियान यशस्वी झाले तर देशाचे नाव जगात उंचावेल व आणखी एक मानाचा तुरा देशाच्या शिरपेचात रोवला जाईल. याप्रसंगी सतिषतात्या महाले यांचेसह मंदिराचे मुख्य विश्वस्त सोमनाथ गुरव, प्रसाद रघुवंशी, राकेश नगराळे, आशिष चौधरी, नितीन माळी, राजू चौधरी, पंकज नगराळे, पवन जाधव, दिव्येश सिंगलदीप, आकाश रक्षे, ओम भोसले, चिराग पाटील आदींची उपस्थिती होती.

## नाशिक जिल्ह्यात कांदा लिलाव सुरु होणार

### केंद्रीय मंत्री डॉ.भारती पवारांची माहिती



**नाशिक । प्रतिनिधी**

कांदा दर वाढीच्या भीतीने केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. त्यावरून शेतकरी आक्रमक होत रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले होते. यानंतर केंद्र सरकारने २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेत कांद्याला २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याचे जाहीर केले.

त्यांनतर कांदा व्यापारी असोसिएशनने जिल्ह्यातील कांदा लिलाव बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत होता. यानंतर आज केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मंत्री पवार यांनी बैठकीत कांद्याच्या प्रश्नावर तोडगा काढत कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेला बंद मागे घेण्यात आला असून आजपासून जिल्ह्यातील कांदा लिलाव सुरू होतील अशी माहिती दिली.

यावेळी बोलतांना डॉ. भारती पवार म्हणाल्या की, शेतकरी आणि व्यापारी असोसिएशनसोबत आज बैठक झाली. या बैठकीत व्यापारी असोसिएशनने उद्यापासून कांदा लिलाव सुरू करण्याचे मान्य केले असून उद्यापासून बाजार समितीत कांदा लिलाव सुरू होतील. नाफेडने कांद्याला २४१० रुपये भाव दिला असून व्यापाऱ्यांनी देखील शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव द्यावा. तर नाफेड जिथे खरेदी करेल. तिथली माहिती बाजार समितीत मिळेल.

## नाशिक जिल्ह्यात सहाय्यक पोलीस निरीक्षकांने मागितली पन्नास हजाराची लाच

### एसीबीकडून अटक

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकसह जिल्ह्यात लाचखोरीने कळस गाठला असून दिवसाआड एसीबीच्या पथकाकडून अधिकारी, कर्मचारी यांना अटक केली जात आहे. असं असताना देखील लाच घेताना इतर कचरताना दिसत नाही. अशातच एसीबीच्या जाळ्यात नाशिक ग्रामीण पोलीस प्रशासनातील सहाय्यक पोलीस निरीक्षक पन्नास हजार रुपयांची लाच स्वीकारताना अडकले आहेत. त्यामुळे नाशिक ग्रामीण पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे.

महसूल आरोग्य, शिक्षण त्याचबरोबर पोलीस प्रशासन देखील लाचखोरीच्या आघाडीवर असल्याचे चित्र आहे. शासनाकडून जनतेच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या अनेक विभागांमध्ये लाचखोरी सुरु असल्याचे अशा कारवायांमधून अधोरेखित झाले आहेत. अशातच नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असलेल्या पोलीस प्रशासनातही लाचखोरीची कीड बळावत चालली आहे. याच ताज उदाहरण म्हणजे येवला पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पन्नास हजार रुपयांची लाच घेताना अटक केली आहे. त्याचबरोबर सोबतच्या पोलीस शिपायाला देखील या प्रकरणी ताब्यात घेतेले आहे. दरम्यान येवला शहर पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस शिपाई हे लाच प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडले आहे. रात्री उशिरा ही कारवाई करण्यात आली असून येवला शहर पोलीस स्टेशन येथे नव्याने दाखल झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक व एक पोलीस कॉन्स्टेबल हे पन्नास हजार रुपयाच्या लाच प्रकरणात जाळ्यात सापडले आहे. तक्रारदार याच्या भावावर दाखल गुन्ह्यात आणखी कलमे वाढवू नये ,यासाठी ही लाच मागितल्याचे बोलले जात आहे. या घटनेने संपूर्ण पोलिस दलात खळबळ उडाली आहे. सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सपकाळे आणि पोलिस शिपाई सतिश बागुल अशी या दोघा लाचखोरांची नावे आहेत. संशयित लाचखोर पोलीस दोघेही येवला शहर पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत आहेत. येवला शहर पोलीस स्टेशन येथे एक गुन्हा दाखल होता. तक्रारदाराचा भाऊ अटकेत असून, लाचेची मागणी सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सपकाळे व पोलिस नाईक सतीश बागुल यांनी केली होती. या गुन्ह्यात पोलीस कोठडीमध्ये मारहाण करणार नाही, तसेच सदर गुन्ह्यात ३०७ वाढीव कलम लावण्याची भीती घालून लाचखोर सपकाळे आणि बागुल यांनी पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केली होती. लाचखोर सपकाळेने गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांचा मोबाईल हिसकावला. तसेच त्यातील मोबाईल डिटेल्स हिस्ट्री डिलीट केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांचा संतप्त सवाल: सांगा, परीक्षा शुल्क कसे भरू?

राज्यात तब्बल दहा वर्षांनंतर तलाठी, जिल्हा परिषद, वनविभाग, जलसंपदा विभाग, आरोग्य विभाग अशा विविध विभागांमध्ये भरती प्रक्रिया राबविली जात आहे. क वर्ग पदाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून सुमारे ९०० ते १००० रूपये आकारली जात आहे. एक हजार रूपये शुल्क आकारणे म्हणजे सरकारकडून सामान्य विद्यार्थ्यांच्या घरावर दरोडाच म्हणावा लागेल, अशी चर्चा विद्यार्थ्यांमध्ये आहे. एकच विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या चार पदांची परीक्षा देणार आहे. त्याने चार हजार रुपये आणायचे कोठून, असा सवाल विद्यार्थ्यांमधून होत आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेसाठी परीक्षा शुल्क कमी करावे, अशी विद्यार्थी संघटना, विद्यार्थ्यांची मागणी आहे.

राज्यामध्ये सुमारे ४५०० तलाठी, प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यासाठी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा होणार आहे. त्यासाठी प्रत्येक पदासाठी विद्यार्थ्यांकडून सरासरी ९०० ते १००० रूपये आकारली जात आहे. तलाठी पदाची अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, परीक्षा सुरू झाली आहे. त्यासाठी इंजिनिअरिंग कॉलेज व कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट परीक्षा केंद्र म्हणून निवडण्यात आले आहे. विद्यार्थ्याला पुन्हा दोन ते तीन हजार रूपये खर्चाचा फटका बसतो. एका परीक्षेसाठी विद्यार्थ्याला सुमारे पाच हजार रूपये खर्च येतो. त्यात अभ्यासासाठी शहरामध्ये राहणे व खानावळ हा खर्च परवडणारा नसतो. स्पर्धा परीक्षा देण्याठी खोली करून राहतात. आई-वडिलांकडून महिन्याला पैसे मागून घेतात. अनेकदा विद्यार्थी वडापाव खाऊन झोपतात. त्यात हा परीक्षेचा खर्च म्हणजे बेरोजगारीत कर्ज करणे असा प्रकार आहे, अशी चर्चा विद्यार्थ्यांच्या वर्तुळात आहे. दरम्यान, आता जिल्हा परिषदेची पद भरती सुरू झाली आहे. पदवीधर विद्यार्थी तीन ते चार पदासांठी अर्ज करू शकतो. त्यामुळे त्याला एकाच वेळी पाच हजार रुपये खर्च येणार आहे. त्यासाठी कर्ज काढावे का, असा सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. सरकारने विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन परीक्षा शुल्क कमी करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत आहे.

### खर्चाचा ताळमेळ जुळविताना दमछाक

सेंट्रल गव्हर्नमेंटच्या स्टाफ सिलेक्शनची कुठलीही जाहिरात आली तरी शंभर रूपयांमध्ये परीक्षा देता येते. परंतु, राज्य शासनाने क वर्ग गटाच्या पदासाठी हजार रूपये परीक्षा शुल्क ठेवले आहे. एमपीएससी, यूपीएससीची परीक्षा ही राज्य शासनाने घेतलेल्या शुल्कापेक्षा कमी पैशांमध्ये देता येते. गावाकडे पुरेसा पाऊस नाही, गेल्या दोन वर्षांपासून शहरामध्ये राहून परीक्षेची तयारी करीत आहे. महिन्याकाठी लागणारा खर्च आणि विविध परीक्षा देण्यासाठी लागणारा खर्च याचा ताळमेळ जुळविताना दमछाक होत आहे, असे देखील तरुणांनी सांगितले.




### शुल्क सामान्यांच्या आवाक्याबाहेरचे

राज्य शासनाने गेल्या अनेक वर्षांनंतर जिल्हा परिषद तलाठी, वन विभाग, जलसंपदा विभाग अशा विविध विभागांची मोठी नोकर भरती सुरू केली. या भरती प्रक्रियेसाठीचे परीक्षा शुल्क सामान्य विद्यार्थ्यांना परवडण्यासारखी नाही. एका परीक्षेसाठी साधारण नऊशे ते एक हजार रुपये आकारले जात आहेत हे सामान्यांच्या आवाक्या बाहेरचे आहे. शासनाने कमीत कमी शुल्क आकारून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.



शोध बातमी
**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

## खान्देशची मुलुख मैदान तोफ थंडावली!

### माजी आमदार गुलाबराव पाटील यांचे निधन



**अमळनेर । प्रतिनिधी**

मायबोली अहिराणीतूनच शपथ घेईल म्हणत संपूर्ण विधानसभा वेठीस धरून विरोधक म्हणून सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडणाऱ्या मुलुख मैदान तोफ माजी आमदार गुलाबराव वामनराव पाटील वृद्धापकाळाने निधन झाले.

गुलाबराव पाटील तीन वेळा एकूण १३ वर्षे जनता दलाचे आमदार होते. शेतकऱ्यांसाठी शिंगाडे मोर्चा, सभागृहातून राजदंड पळवणे आदी भूमिका लक्षवेधी ठरल्या होत्या. पाटील हे तीन वेळा एकूण १३ वर्षे जनता दलाचे आमदार होते. शेतकर्यांसाठी शिंगाडे मोर्चा, सभागृहातून राजदंड पळवणे आदी भूमिका लक्षवेधी ठरल्या होत्या. ते समाजवादी विचारसरणीचे होते. त्यांचा महाराष्ट्रभरात दरारा होता. साची संदेश वृत्तपत्राचे पत्रकार म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. दीर्घ काळ जनता दलात राहिल्यानंतर राजकीय जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. महाराष्ट्रातील समाजवादी विचारसरणीच्या दमदार फळीतील शेवटचा नेता निखळला.

# संवाद आणि समन्वय

लोकसभा निवडणुकांच्या आधी पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका होतील. या निवडणुका लोकसभेसाठी रंगीत तालीम असेल. यामध्ये खर्गे आणि पक्षातील त्यांच्या ज्येष्ठ सहकार्यांचा कस लागणार आहे.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पक्षाची नवी कार्यकारिणी जाहीर केली. पक्षाध्यक्षपदाची निवडणूक लढविलेले शशी थरुर, पूर्वीच्या 'जी २३' गटाचेच आनंद शर्मा अशा नेत्यांचा कार्यकारणीत समावेश आहे. याबरोबरच युवा नेत्यांना मोठ्या संख्येने स्थान देण्यात आले आहे. पक्षासमोर असलेल्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर खर्गे यांनी संवादी आणि समन्वयाची भूमिका घेतल्याचे यातून दिसते. शिवाय, वास्तवाला सामोरे जाण्याची मानसिकता असल्याचेही कार्यकारणीच्या रचनेवरून लक्षात येते. ८४ सदस्यांच्या या कार्यकारणीत राजस्तानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांचा समावेश लक्षवेधक म्हणावा लागेल. राजस्तान, मध्यप्रदेशसह पाच राज्यांमध्ये या वर्षअखेरीस निवडणुका होत आहेत. राजस्तानमधील सत्ता कायम राखण्याचे आव्हान काँग्रेसला पेलावे लागेल. यासाठी केवळ मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यावर विसंबून राहण्याची पक्षाची तयारी दिसत नाही, हे राष्ट्रीय कार्यकारणीत सचिन पायलट यांचा समावेश केल्याने स्पष्ट झाले आहे. अशोक गेहलोत यांची भाजपच्या नेत्या वसुंधराराजे शिंदे यांच्याबद्दल असलेली सहानुभूतीची भूमिका हा कायम चर्चेचा विषय राहिला. सोनिया गांधी नव्हे, तर वसुंधराराजे या गेहलोत यांच्या नेत्या असल्यासारखे वाटते, असा जोरदार टोला मध्यंतरी पायलट यांनी लगावला. एकीकडे कल्याणकारी योजनांवर असलेला गेहलोत यांचा भर, दुसर्या बाजूला आपले मुख्यमंत्रिपद पक्के करण्यासाठी पायलट यांचे दौरे, या संघर्षात राजस्तानमध्ये काँग्रेस पक्ष अडकला आहे.

समतोल साधण्याचा प्रयत्न

दोन वेळा राजस्तानचे मुख्यमंत्रिपद भूषविलेल्या वसुंधराराजे यांना भाजपने जाहीरनामा समितीत स्थान दिलेले नाही. म्हणजेच, राजस्तानात दोन्ही प्रमुख पक्षांमध्ये अस्वस्थताच दिसते. काँग्रेस पक्ष सोडून मुख्य मंत्रिपद भूषविण्याची संधी आपण गमावणार नाही, असे पायलट म्हणाले होते. कार्यकारणीतील त्यांचा समावेश त्यांच्या या महत्त्वाकांक्षेला बळ देणारा आहे. सोनिया गांधी, डॉ. मनमोहन सिंग, ए.के. अँटनी अशा ज्येष्ठांसह गौरव गोगोई, कन्हैयाकुमार, प्रणिती शिंदे, अलका लांबा, दीपेंद्र हुडा या युवा नेत्यांना संधी देत समतोल साधण्याचा प्रयत्न खर्गे यांनी केला आहे. अर्थात, निष्ठावान नेत्यांचा कार्यकारिणीत वरचष्मा असून ते स्वाभाविक म्हणावे लागेल. नव्या कार्यकारिणीच्या निमित्ताने खर्गे यांनी साधलेला समतोल त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाचा प्रत्यय देणारा आणि संघटनेवर त्यांनी पकड मिळविली असल्याचा संदेश देणारा आहे. 'जी २३' गटाचे गुलाम नबी आझाद यांच्यासारखे काही नेते पक्षाबाहेर पडले तरी या गटातील बहुतेकजण पक्षात राहिले. यापैकी थरुर, आनंद शर्मा, मनीष तिवारी असे नेते नव्या कार्यकारिणीत आहेत. निवडणुकांमध्ये सातत्याने होणार्या पराभवांच्या पार्श्वभूमीवर 'जी २३' गट त्यावेळी सक्रिय झाला. या गटाचा रोख गांधी कुटुंबाकडे होता. ज्येष्ठ पदाधिकार्यांचा कार्यकारिणीत अपमान होतो, मनमानी पद्धतीने निर्णय घेतले जातात, हे या गटाचे म्हणणे होते. पक्षाने आत्मपरीक्षण करावे हा सल्ला देतानाच पक्ष नेतृत्वात बदल व्हावा, ही भूमिकाच त्या गटाकडून सूचित होत होती. या पेचप्रसंगावर निवडणुकीमुळे मार्ग निघाला. शशी थरुर यांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. गांधी कुटुंबाचा पक्षात कायम असलेला प्रभाव खर्गे यांच्या निवडीतून दिसला. 'जी २३' गटामुळे आलेली कटुता संपवून पक्षाने व्यापक भूमिका घेतलेली दिसते. काँग्रेस पक्षाला भाजपचे आव्हान पेलायचे असेल तर अशाच व्यापक दृष्टिकोनाची गरज आहे. खर्गे यांनी त्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकले आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीत झालेला विजय पक्षाला नवी आशा देणारा ठरला. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेला चांगला प्रतिसाद मिळाला. जनमत अनुकूल करून घेण्यासाठी पक्षाची नवी कार्यकारिणी कशी पावले टाकते, हे महत्त्वाचे. पक्षातील मरगळ दूर करून संभ्रम संपविण्याचा निर्णायक प्रयत्न, या दृष्टीने कार्यकारिणीकडे पाहता येईल. वेडीवाकडी विधाने करून या प्रयत्नांना सुरुंग लावण्याची मानसिकता असलेल्या दिग्विजय सिंग आणि त्यांच्या प्रभावळीत शोभणार्या नेत्यांना संयमाची दीक्षा देणेही तेवढेच आवश्यक ठरेल.

# प्रधानमंत्री संग्रहालय

काँग्रेस पक्षाने देशावर साठ दशकांहून अधिक काळ सत्ता उपभोगली. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी असे एकाच परिवाराने तीन पंतप्रधान देशाला दिले. लाल बहादूर शास्त्री, नरसिंह राव, डॉ. मनमोहन सिंग असे गांधी परिवाराच्या बाहेरील काँग्रेस पक्षाच्या मोजक्याच नेत्यांना पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर बसण्याची संधी मिळाली.



परिवाराच्या बाहेरील काँग्रेसचा पंतप्रधान झाला तरी सत्ताकेंद्री गांधी परिवारच कायम राहिले आहे. म्हणूनच नेहरू-गांधी परिवारातील नेत्यांचीच सर्वाधिक नावे देशातील सार्वजनिक संस्थांना आणि शासकीय योजनांना दिली गेली आहेत. राजधानी दिल्लीत नेहरू मेमोरिअल प्रसिद्ध आहे. देशाच्या पंतप्रधानांना मिळालेल्या भेट वस्तूंचे हे संग्रहालय आहे. देशात विविध पक्षांचे अनेक पंतप्रधान झाले, मग या संग्रहालयाला केवळ पंडित जवाहरलाल नेहरू यांचेच नाव का? असा कोणी विचारही केला नाही. अनेकांना नेहरूंचे नाव इतके वर्षे खटकत होते. पण त्यावर उघडपणे कोणी बोलत नव्हते. काँग्रेसव्यतिरिक्त मोरारजी देसाई, व्ही. पी. सिंग, एच. डी. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल, चंद्रशेखर, अटलबिहारी वाजपेयी आणि आता गेली दहा वर्षे नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाले पण त्यांचे नाव संग्रहालयाला द्यावे असे कोणी म्हटले नाही. सार्वजनिक संस्था व शासकीय योजना नेहरू-गांधी परिवाराच्या नावानेच चालल्या पाहिजेत, देशाचे कर्तेकरविते केवळ नेहरू-गांधी परिवारच आहे, असे काँग्रेस हायकमांडला वाटत असावे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी धाडस दाखवले व नेहरू संग्रहालयाचे नाव प्रधानमंत्री (पंतप्रधान) संग्रहालय असे करून दाखवले. नेहरूंचे नाव हटवून प्रधानमंत्री संग्रहालय असे नामकरण झाल्यावर गांधी परिवार व त्यांच्याशी जोडलेला काँग्रेस नेत्यांचा परिवार अस्वस्थ व संतप्त झाला. मोदी हे द्वेषाचे राजकारण करीत आहेत, असा आरोप झाला.

केंद्र सरकारने यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या दिवशीच म्हणजे १४ ऑगस्ट रोजी दिल्लीतील नेहरू मेमोरिअलचे नामांतर प्रधानमंत्री संग्रहालय असे केले. काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी म्हटले, पंडित नेहरूंची ओळख ही त्यांचे कार्य आहे, त्यांचे नाव नाही नेहरू मेमोरिअल हा फलक हटवून प्रधानमंत्री संग्रहालय असा नवा फलक झळकल्यावर काँग्रेस पक्षातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्यावर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटले, आम्ही सर्वच माजी पंतप्रधानांचा आदर करतो, ते कुठल्याही पक्षांचे असले तरी आम्ही त्यात भेदभाव करीत नाही. प्रधानमंत्री संग्रहालय असे नामांतर केल्यामुळे काँग्रेस विनाकारण राजकीय मुद्दा बनवत आहे. प्रधानमंत्री नाव देण्यात काँग्रेसला काय समस्या वाटते हे मला समजत नाही?

दि. १४ ऑगस्टला नेहरू मेमोरिअल हे नाव हटवून प्रधानमंत्री संग्रहालय हा नवा फलक लागला तरी नामांतराचा निर्णय याच वर्षी दि. १५ जून रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका बैठकीत घेण्यात आला होता. ज्या वास्तुत प्रधानमंत्री संग्रहालय आहे, ती वास्तू म्हणजेच दिल्लीतील प्रसिद्ध तीन मूर्ती भवन, ब्रिटिश काळात १९२९-३० मध्ये उभारण्यात आले होते. त्यावेळी कमांडर इन चीफ यांचे ते निवासस्थान होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हीच वास्तू पंडित जवाहरलाल नेहरू यांचे अधिकृत निवासस्थान झाले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही नेहरू मेमोरिअलच्या नामांतरावरून केंद्र सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, ज्यांच्याकडे इतिहास नाही, ते दुसऱ्याचा इतिहास मिटविण्याचे काम करीत आहेत. स्मारकाचे नाव बदलून आधुनिक भारताचे निर्माते व लोकशाहीचे समर्थक पं. नेहरू यांचे व्यक्तिमत्त्व संकुचित करता येणार नाही. नामांतरातून सत्ताधारी पक्षांची मानसिकता दिसून येते.

सन २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाच्या सर्व माजी पंतप्रधानांना समर्पित असे संग्रहालय असावे असे बोलून दाखवले होते. काँग्रेसचा विरोध डावलून नेहरू मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी उभी केली व २१ एप्रिल २०२२ रोजी त्याचे उद्घाटनही केले. एडविन लुटियन्स यांनी राजधानीत १९२९-३० मध्ये तीन मूर्ती भवन उभारले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरू याच वास्तुत १६ वर्षे राहिले. नेहरूंचे २७ मार्च १९६४ रोजी निधन झाले. नेहरूंच्या निधनानंतर तत्कालीन सरकारने तीन मूर्ती भवन नेहरूंना समर्पित करण्याचा निर्णय घेतला. तसेच त्या वास्तुत एक संग्रहालय व एक पुस्तकालय उभारण्याचा प्रस्ताव सरकारने तयार केला. दि. १४ नोव्हेंबर १९६४ रोजी पंडित नेहरूंच्या ७५व्या जयंतीला तत्कालीन राष्ट्रपती एस. राधाकृष्णन यांनी तीन मूर्ती भवन राष्ट्राला समर्पित केले व नेहरू स्मारक संग्रहालयाचे उद्घाटन केले. दोन वर्षांनंतर स्मारकाची देखभाल व व्यवस्थापन यासाठी एनएमएमएल सोसायटीची स्थापना केली व तेव्हापासून ही व्यवस्था कायम आहे. आता या सोसायटीचे अध्यक्ष पंतप्रधान या नात्याने नरेंद्र मोदी हेच आहेत. सोसायटीवर २९ सदस्य असून त्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, धर्मेंद्र प्रधान, जी. किशन रेड्डी, अनुराग ठाकूर आदींचा समावेश आहे.

नेहरू मेमोरिअलचे नामांतर झाल्यानंतर अन्य विरोधी पक्ष शांत राहिले, मात्र काँग्रेस पक्षाने आपल्यावर फार मोठा अन्याय झाला असा आक्रोश सुरू केला. नेहरूंचा वारसा मोदी सरकारला संपुष्टात आणायचा आहे, अशी टीका काँग्रेसने केली. काँग्रेसने म्हटले की, पंडित नेहरूंनी आधुनिक भारताचा पाया रचला. त्यांनी आयआयएम, एम्स, आयआयटी, इस्त्रो, अशा अनेक संस्था उभ्या केल्या. या देशातील लोकशाही जिवंत ठेवली. पण मोदी सरकार नकारात्मक स्वरूपात इतिहास दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे.

देशात पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी अशा नेहरू-गांधी परिवाराच्या नावाने साडेचारशेहून अधिक प्रकल्प व योजना अस्तित्वात आहेत. पाँडेचेरी, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पोर्ट ब्लेअर, तेलंगणा, छत्तीसगड, तामिळनाडू, बिहार, दिव-दमण, दिल्ली, गोवा, राजस्थान, पश्चिम बंगाल, आसाम, सिक्कीम अशा बहुतेक सर्व राज्यांत नेहरू यांचे नाव असलेली वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये. तंत्रज्ञान विद्यापीठे, महाविद्यालये, बिझनेस मॅनेजमेंट संस्था, नवोदय विद्यालये, असा मोठा शैक्षणिक संस्थांचा पसारा आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, अहमदनगर येथे जवाहर नवोदय विद्यालय, गोव्यात जवाहर नवोदय विद्यालय आहे. देशात सर्वत्र असलेल्या नवोदय विद्यालयांना जवाहर नेहरू यांचेच नाव आहे. दिल्ली, बुराणपूर, गुवाहटी, कोइम्बतूर, त्रिशूर, हैदराबाद, उदयपूर, जयपूर, कोयनानगर, बोकोरो आदी ठिकाणी नेहरूंच्या नावाने मोठी उद्याने (पार्क) आहेत. जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन हे नाव केंद्र सरकारच्या योजनेला आहे. नेहरू कप (क्रिकेट), नेहरू कप (फुटबॉल), नेहरू ट्रॉफी बोट रेस या नावाने स्पर्धा आहेत. चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, कोची, शिलाँग, गजियाबाद, तिरुचिरापल्ली, दुर्गापूर, गुवाहटी, हुबळी, पुणे, इंदूर, कोट्यायम, शिमोगा टुमकूर या शहरांत जवाहरलाल नेहरू स्टेडियम आहेत. याखेरीज जवाहरलाल नेहरू यांच्या नावाने चौक, सर्कल, कला केंद्र, प्लॅनेटोरियम, जलाशये, सेतू, बोगदे, रस्ते, तेल शुद्धीकरण प्रकल्प, पूल, फाऊंडेशन, नेहरू प्लेस, सायन्स सेंटर, बस स्थानके बहुसंख्य शहरांत व गावागावांत आहेत. देशात सर्वत्र इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या नावाने असलेल्या संस्था, शाळा-कॉलेजेस, पुरस्कार, पारितोषिके, क्रीडा संकुल, घरकुल योजना, खुली विद्यापीठे, कन्या विद्यालये, इस्पितळे, आवास योजना, अणुसंशोधन केंद्र, उपाहारगृहे, झोपडपट्ट्या, मैदाने, विद्यापीठे, क्रीडा स्पर्धा, महिला व बाल चिकित्सालये, मूकबधिर विद्यालये, साखर कारखाने, महिला बँका, अभयारण्य, पार्क, बगीचे, विकास संशोधन संस्था, ग्रंथालये, गोदी, विमानतळ अशी भली मोठी यादी देता येईल. पण नेहरू मेमोरिअलमध्ये देशाच्या सर्व पंतप्रधानांना मिळालेल्या भेटवस्तूंचा संग्रह असताना केवळ एकाच पंतप्रधानांचे नाव कशासाठी असा विचार मोदी सरकारने केला, तर त्यात काय चुकले? शेकडो नावांच्या यादीतून परिवाराचे एक नाव पुसले गेले म्हणून काँग्रेसने आक्रोश करणे हे निव्वळ राजकारण आहे.

**- इंडिया कॉलिंग: डॉ. सुकृत खांडेकर**

# परमात्मा सर्वज्ञ आहे - संत राजिन्दर सिंह जी महाराज

सत्याला स्थापित करण्याकरिता अनेक बाबी सहाय्यक होतील. सर्वप्रथम आपल्याला हे समजून घेतले पाहिजे की जेव्हा आपण इतरांपासून काही लपवितो, त्यावेळी परमात्म्यापासून ते लपवू शकत नाही. परमात्मा सर्वज्ञ आहे आणि ते आपल्याला नेहमी पाहात आहेत. आपण विचार करू शकतो की भक्तवत्सल महान परमात्म्या जवळ आपल्या सारख्या तुच्छ जीवां विषयी विचार करण्याकरिता वेळ कुठे आहे, परंतु परमात्म्याला गवताच्या छोट्या काडी पासून या ग्रहांवर विचरण करणार्या विशालतम जीवांच्या प्रत्येक बाबीसंबंधी सर्व माहीत असते. परमात्म्याच्या सदैव जागृत तसेच चैतन्याच्या दृष्टी पासून आपण लपून राहू शकत नाही. कारण परमात्मा प्रत्येक जीवाच्या अंतरी विराजमान आहे. जर आपण समजून घेतले की परमात्मा सदैव आपल्या बरोबर आहे तर आपल्याला अनुभव होईल की भले आपण इतरांपासून काही बाबी लपवू शकू, परंतु परमात्म्याला आपले सर्व विचार, बोल आणि कृती यांचे ज्ञान असते.


## दिव्य संगीत

प्रभूची ज्योती व आवाज अंतरीक दिव्य मंडलांचा राग आहे, दिव्य अमृत आहे. हे ते संगीत आहे जे शाश्वत परमानंद देते.



ज्यांनी हे संगीत ऐकले, ते या विषयी त्या लोकांना कसे सांगतील ज्यांनी केवळ भौतिक संगीत ऐकले आहे? एक सामान्य मनुष्य बहिऱ्या लोकांना कसे समजावेल की आवाज कसा असतो? आपण केवळ एक अपूर्ण तुलना करु शकतो. हे दिव्य संगीत सदैव आपल्या अंतरी वाजत आहे. आपण त्या विषयी बहिरे आहोत कारण कोणीही आपणास कसे ऐकावे, हे शिकविले नाही. हे संगीत काय आहे? आपण कोणत्याही धर्माचे धर्मग्रंथ वाचले तर आपल्याला आंतरिक संगीताचे संदर्भ मिळतील. या आवाजाला बाइबल मध्ये 'वर्ड' ('ीव') (शब्द) म्हंटले आहे. हिंदू धर्म ग्रंथामध्ये 'ज्योती आणि श्रुती' म्हटले आहे. पारसी ग्रंथांमध्ये 'सरोषा', मुस्लिम धर्म पुस्तकां मध्ये' कलमा', बौद्ध ग्रंथांमध्ये 'सोनोरस लाईट', शीख धर्म ग्रंथामध्ये 'नाम किंवा शब्द', तसेच थियोसोफी मतांमध्ये 'व्हॉईस ऑफ सायलेन्स' (नीरव शांततेचा आवाज) म्हंटले आहे. प्रभूच्या संगीतामध्ये एक प्रकारचे चुंबकीय आकर्षण आहे. जे आपल्या आत्म्याला स्वतःकडे आकृष्ट करून घेते आणि आपल्या आत्म्याला आंतरिक अध्यात्मिक मंडलांमध्ये घेऊन जाते. हा आवाज आपणास अवर्णनीय आनंदाने विभोर करतो. हा आनंद या जगातील कोणत्याही आनंदापेक्षा सरस आहे.

## शब्दकोडे-१५९



आडवे शब्द

१. उन्नती ४. केळ्यांचे मिष्टान्न ७. नभ १०. प्रेमक्रीडा ११. अग्नी १३. मच्छर १५. वस्त्र १७. ब्रेड १८. सुनिल ----- माजी क्रिकेटवीर २०. बिस्कीटांचा एख अधिक तूप घालून केला जाणारा प्रकार २४. पंढरपूरच्या विठ्ठलाचा पुजारी २७. दुबळा ३१. वजन मोजण्याचे साधन ३४. डाळ-तांदळाचा दाक्षिणात्य पदार्थ ३६. दडपण ३७. कदर ३९. आदराने मस्तक झुकवलेला ४०. वर्ष ४१. विश्वेश्वाराची नगरी ४३. मोठी वाटी ४५. मुक्काम ४८. आवड ५०. व्यवस्था ५३. पुष्कळ ५५. निर्धन ५८. गुंड ५९. परागकण ६०. सहाय्य ६१. गोदाम ६२. सुगरण पक्ष्याचे घरटे ६३. प्रकट, उघडपणे ६४. वेल ६५. असहाय्य, निरुपाय ६७. केवळ ६८. सुंदर तरुणी ६९. मिरवणूक ७१. लाल गराचा गोड कंद ७२. मैत्रीण ७३. जंगली ७५. कमी वेळात ७८. ताणल्यास तुटणारे ८०. गवतासारखी पाने असलेली भाजी ८१. जवळच्या भागात ८३. पंख ८४. डिंकाला पर्याय ८५. संपत्ती ८६. बासरी ८७. एक देशी खेळ ८८. कसदार ९०. तुकारामांना त्रास देणारा ९२. चार्ली ---- जगभर गाजलेला अभिनेता ९३. रेषा, रेघ ९४. मध्यस्थी निर्णय करणारी यंत्रणा

उभे शब्द

१. ओंकार २. दया ३. विचार ५. सुळका ६. जीभ, चव ८. गायक ९. नाडी १०. विद्यापीठातील 'रीडर' ११. अवकाश, वेळ १२. शैली १४. अशी दृष्टी म्हणजे छिद्रान्वेषी १६. हमखास १९. कसाबसा, कष्टपूर्वक २१. नलिका २२. जप्ती २३. पितामह २५. वायू २६. मधुर २८. कामदेव २९. गोळा ३०. चरबी ३२. निबर ३३. प्रभाव, सत्ता ३४. येथे ३५. चमत्कार ३८. जाडसर दळलेला गहू ४०. जाळीदार ४२. रक्तवाहिनी ४४. गुणांची पारख नसलेला ४६. नृप ४७. अस्तनी ४९. नगण्य ५१. विद्युत ५२. पावलांचा आवाज ५४. शांतता ५६. दुखावलेला ५७. आश्चर्य ६०. पृथ्वी ६३. मुद्दाम ६४. वाईट सवय ६५. डच्चू ६६. बगळा ७०. दानव ७२. माळ, बरोबरी ७४. महिना ७६. नवरदेव ७७. राखण ७९. वटवट ८१. हुकूम ८२. पाठबळ ८६. पातक ८८. मित्र ८९. टोचणी ९०. सावकाश ९१. विजय, सरशी

## शब्दकोडे १५८ चे उत्तर

**आडवे उत्तर** - ३.आस ५.मुबलक ८.अटक ११.विठ्ठला तू वेडा कुंभार १३.वदनी कवळ १४.दहाडे १६.रमी १९.विलाप २४.लतामंडप २५.क्षमा २७.कपाळकरंटा २८.छान २९.रीळ ३०.नक्षा ३१.गलबत ३२.भास ३३.पिनाक ३५.वाटा ३६.द्विज ३८.पुरेसा ३९.लगट ४२.कष्ट ४३.इतरत्र ४५.राजहट्ट ४८.सुवर्ण ५०.चक्षु ५१.फी ५२.कसब ५४.धार ५५.खोट ५६.सबंध ५७.अवतरण ५८.कथा ५९.कर्ण ६०.खेटर ६२.पर ६३.मान ६४.बाळकडू ६६.सार्व ६७.राणीवसा ६९.बाजा ७०.पातक ७२.अनभिज्ञ ७३.म्हातारचळ ७५.पर्जन्य ७६.नवनीत ७७.कटी ७८.शिताफी

**उभे उत्तर** - १.सविस्तार २.तलाव ३.आवेश ४.सडा ५.मुभा ६.बरड ७.कवळी ८.अनीता ९.टक १०.कवन १२.कुंचला १५.हाड १७.मीलन १८.अमंगल १९.विपरीत २१.उपासना २२.शिकस्त २३.आटापिटा २६.मनसपुत्र २८.छात्र ३१.गजकर्ण ३१अ.बत्ती ३३.पिसारा ३४.कलह ३५.वाट ३७.शांत ४०.गट्ट करणे ४१.वसुधा ४३.इक्षु ४४.रक्तबंबाळ ४६.जलावरण ४७.लांब ४९.वरकरणी ५०.चटकन ५३.सण ५७.अट ६०.खेडूत ६१.सर्वज्ञ ६२.पराधीन ६३.मासा ६४.बाजार ६५.कपाळ ६६.साभिनय ६८.वहिनी ६९.बाताड्या ७१.कपटी ७२.अन्य ७४.चर्म

# मंदी चीनमध्ये; धास्तावले जग

अर्थव्यवस्था स्थिर होईल, असा विश्वास ठेवण्यासाठी संयम दाखवायला हवा; परंतु 'पिनपॉइंट असेट मॅनेजमेंट'चे मुख्य अर्थशास्त्रज्ञ झिवेई झांग यांनी सांगितले की, सरकारने लागू केलेल्या धोरणांचा लवकरच परिणाम होईल की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चीनची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी सरकारला गुंतवणूकदार आणि ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण करावा लागेल. मूळ मुद्दा हा आहे की, सरकार खासगी क्षेत्राचा विश्वास मिळवू शकेल का, जेणेकरून ग्राहक आपले पैसे वाचवण्याऐवजी खर्च करू लागतील. व्यावसायिक गुंतवणूक वाढावी आणि अर्थव्यवस्था वेगवान व्हावी यासाठी आतापर्यंत काहीही झाले नाही. मार्च २०२४ पर्यंत सरकारने परिस्थिती नियंत्रणात आणली, तरच अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर येईल. सरकार परिस्थितीवर नियंत्रण ठेवू शकले नाही, तर चीनच्या अडचणी वाढतीलच; शिवाय चीनमधून आयात करणाऱ्या देशांचीही परिस्थिती बिकट होईल.

चीननिर्मित वस्तूंची जगभर विक्री होते. चीनमध्ये वस्तूंच्या किमती कमी होणे ब्रिटनसारख्या देशांना फायदेशीर ठरू शकते. चीनकडून वस्तू खरेदी केल्यामुळे त्याचे आयात बिल कमी होईल; परंतु याचा विपरीत परिणाम इतर देशांच्या उत्पादकांवर होईल. ते चीनच्या स्वस्त वस्तूंच्या स्पर्धेत आपला माल विकू शकणार नाहीत. त्यामुळे त्या देशांमधील गुंतवणूक कमी होऊन बेरोजगारी वाढू शकते. चीनचे उत्पादन स्वस्त असल्याचा परिणाम इतर देशांच्या कंपन्यांवर होणे साहजिक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक देश चीनमधील उत्पादन थांबवून इतर देशांमध्ये जाण्याचा प्रयत्न करत आहेत. या बाबतीत अमेरिका पुढे आहे. २०१९ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा हवाला देत अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, चीन हे अमेरिकन व्यवसायासाठी सुरक्षित ठिकाण नाही. त्यांनी कंपन्यांना चीनमधून बाहेर पडण्याचे आवाहन केले. चीनला हेही माहीत आहे की सध्या अनेक देश चीनकडे उत्पादन केंद्र म्हणून पाहू इच्छित नाहीत. त्यामुळे चीनला उत्पादन खर्च इतका कमी करायचा आहे की, इतर देशांना अशा दरामध्ये देशांतर्गत उत्पादन करणे परवडणार नाही. आयात शुल्क वाढवूनही विविध देशांमधली उत्पादने चीनच्या उत्पादनांशी स्पर्धा करू शकत नाही. चीनमधून आयात करणे हाच त्यांच्यासाठी उत्तम पर्याय ठरेल. दुसरीकडे, ते देशांतर्गत बाजारपेठ मजबूत करण्याचाही प्रयत्न करत आहेत. भारत आयातीसाठी चीनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. येत्या काही वर्षांमध्ये त्यात बदल होईल, अशी शक्यता नाही; पण अडचण अशी आहे की, भारत आणि चीनदरम्यान मुक्त व्यापार करार नसल्याने थेट चीनकडून स्वस्तात माल मिळू शकणार नाही. **समाप्त:**

**- प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# शिंदे औद्योगिक वसाहतीत मूलभूत सुविधा पुरविण्यावर भर देणार-बेळे

नाशिक । प्रतिनिधी

शिंदे- ब्राह्मणवाडे औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी निमातर्फे पुढाकार घेतला जाईल, असे आश्वासन निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी दिले.

शिंदे - ब्राह्मणवाडे औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांनी आम्हाला मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात त्यासाठी प्रयत्न करा, असे साकडे निमाला घातले. बेळे यांनी तातडीने तेथील उद्योजकांना चर्चेसाठी निमा कार्यालयात पाचारण केले असता या उद्योजकांनी विविध मूलभूत समस्यांचा पाढा वाचला. शिंदे औद्योगिक वसाहतीत प्लॉट खरेदी करून ग्रामपंचायत मिळकत रजिस्टरला आमची नावे नोंदविण्यात आली आहे. पैकी १५० हुन अधिक उद्योग सुरू केले आहे. तर काही सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र आमच्या औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची अवस्था खूपच बिकट आहे. त्याचे त्वरेने डांबरीकरण होणे गरजेचे आहे. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने तेथील पथदीप तातडीने बसवून मिळावेत.

## निमा कार्यालयात उद्योजकांनी मांडल्यात व्यथा




घनकचऱ्याच्या विल्हेवाटीची व्यवस्था व्हावी. पाण्याची उपलब्धता नसल्याने प्रत्येक उद्योजकाला त्याची स्वतंत्र व्यवस्था करावी लागत आहे. ड्रेनेजची स्वतंत्र व्यवस्था नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागते. वर्गणी आणि खंडणीच्या नावाने अनेक लोक त्रास देतात, त्यांचा बंदोबस्त व्हावा. निमाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र प्लॉट अथवा जागा उपलब्ध व्हावी यासाठी पाठपुरावा करावा आदी मागण्यांचा उद्योजकांनी यावेळी मांडल्यात.

या सर्व प्रश्नांवर मुद्देसूद चर्चा झाली. या वेळी बेळे यांनी वीज मंडळातर्फे सबस्टेशन मंजूर झाले असले तरी त्याबाबत पुढे काही हालचाली नाहीत त्याबाबतही उद्योजकांनी निदर्शनास आणताच बेळे यांनी तातडीने अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. या सबस्टेशनसाठी जागा घेतली, टेंडर प्रक्रिया सुरू झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. एनएमआरडीएशी निगडित असलेल्या प्रश्नांबाबत लवकरच नूतन आयुक्त सतीश खडके यांच्याशी बैठक लावून प्रश्नांची उकल केली जाईल असे बेळे म्हणाले. जि.प.शी निगडित असलेल्या प्रश्नाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्याशी चर्चा घडवून आणू. वर्गणी अथवा खंडणी कोणी मागत असेल तर तातडीने गुन्हे नोंदवा अथवा निमा कार्यालयाशी संपर्क साधा, असेही बेळे म्हणाले. लेबर सेसच्या नावाखाली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या, ज्यांनी पीएफ आणि ईएसआयसाठी नोंदणी केली आहे आणि ज्यांना आपल्या उद्योगाचा विस्तार करायचा आहे त्यांना लेबर सेस भरण्याची आवश्यकता नाही असे बेळे यांनी निदर्शनास आणले.

शिंदे औद्योगिक वसाहतीत दीडशेहून अधिक उद्योजक असून त्यापैकी अनेक जणांनी आतापर्यंत निमाचे सदस्यत्व स्वीकारले आहे. यावेळी निमा सब कमिटीवर शिंदे वसाहतीतील सचिन तेजाळे आणि किरण मते यांना घेण्याचा प्रस्ताव पारित करण्यात येईल.

बैठकीस उपाध्यक्ष किशोर राठी, सचिव राजेंद्र अहिरे, कमलकिशोर करवा, राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, कैलास पाटील, मनीष रावल, राजेंद्र काबरा, विशाल भाटिया, प्रतीक कांकरिया, नितीन पाटील, किरण वाजे, किरण मते, के.ए.जाधव, सचिन तेजळे, विलास सोनवणे, अता शेख आदींसह मोठया संख्येने उद्योजक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदतीसाठी पालकमंत्री कार्यालयाशी संपर्क करा

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत मिळत असते. मात्र जनतेला माहिती नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. रुग्ण योजनेच्या निकषात बसत असल्यास त्यांनी नाशिक पालकमंत्री कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विविध शस्त्रक्रिया, आजारांवरील उपचारांसाठी मदत दिली जाते. ही प्रक्रिया अतिशय सोपी असली तरी अनेकांना अडचणी येत असतात अशावेळी रुग्णांनी नाशिक येथील संभाजी चौक उंटवाडी रोड याठिकाणी जावून आपले कागदपत्रे जमा करून मदत मिळवू शकता अशी माहिती यावेळी दिली. यासाठीचा अर्ज कुठे मिळतो, तो कसा भरायचा किंवा तो मुख्यमंत्री कार्यालयातूनच घ्यावा का, अशा विविध शंका सर्वसामान्यांच्या मनात असतात. सर्वसामान्य नागरिकांची ही शंका दूर करण्यासाठी पालकमंत्री कार्यालया मार्फत स्वतंत्र वैद्यकीय कक्ष स्थापन केला असून यातून गेल्या चार महिन्यात शेकडो रुग्णांना मदत झाली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून नाशिक जिल्ह्यासाठी आतापर्यंत ४ कोटी ५५ लाख रुपये मदत झाली आहे. रुग्णांना मदत मिळविण्यासाठी पालकमंत्री कार्यालय नाशिक येथील पंकज सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधून मदत मिळवावी असे आवाहन करण्यात आले आहे. ९४०४५००२१४ यावर संपर्क करता येईल.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी हृदयरोग, मेंदूरोग, नवजात बालके, मूत्रपिंड प्रत्यारोपण प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, डायलिसिस, हृदयप्रत्यारोपण, सीव्हीए, बोन मॅरो ट्रान्सप्लांट या ११ गंभीर आजारांसह एकूण २० आजारांवर उपचार मिळण्यास मदत होते. उपरोक्त तीनही योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून वैद्यकिय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते.

रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी. अपघात असल्यास, एफआयआर किंवा एमएलसी असणे आवश्यक आहे. अवयव प्रत्यारोपण असल्यास रुग्णालयाचे मान्यता प्रमाणपत्र अथवा झेडटीसीसी येथे नोंदणी केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी**

अर्ज (विहीत नमुन्यात), वैद्यकिय खर्चाचे अंदाजपत्रक, प्रमाणपत्र मुळप्रत डॉक्टरांच्या सही व शिक्क्यासह, खाजगी रुग्णालय असल्यास सिव्हील सर्जन यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे.
तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (रुपये एक लाख साठ हजारपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.) रुग्णाचे आधारकार्ड (महाराष्ट्र राज्याचे), रुग्णाचे रेशनकार्ड (महाराष्ट्र राज्याचे), संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे.

## दहावीतील मुलीने घेतला गळफास

**नाशिक ।** सिन्नर तालुक्यातील शहा येथे गावातीलच तीन तरुणांनी दहावीत शिकणाऱ्या वैष्णवी नवनाथ जाधव (१६) हिच्या घरी येऊन तिच्या वडिलांची गच्ची धरून शिवीगाळ, दमदाटी केली. तू जगण्याच्या लायकीची नाही; जीव दे, अन्यथा आम्हीच तुझा गेम करतो,' अशी धमकी दिल्याने हा त्रास सहन न झाल्याने वैष्णवीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. नातेवाइकांनी मृतदेह पोलिस स्टेशनसमोर आणल्यानंतर तीन संशयीतांवर गुन्हा दाखल झाला. आपल्या मृत्यूला जबाबदार असलेल्या तीन तरुणांच्या नावे तिने चिठ्ठी लिहिलेली आहे.

## पीएम स्वनिधी योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : पालकमंत्री भुसे यांचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक महापालिकेमध्ये शहरी फेरीवाल्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत 'पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' योजना (पीएम स्वनिधी) सुरु आहे. नाशिक मनपा कार्यक्षेत्रात व्यवसाय करत असलेले व ज्यांनी अद्याप पर्यंत पीएम स्वनिधी योजनेचा लाभ न घेतलेले असे सर्व पथविक्रते (छोटे व्यवसाय करणारे सर्व) यांनी या योजनेचा जास्तीत-जास्त लाभ घ्यावा. असे आवाहन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे. पीएम स्वनिधी योजनेतर्गत १० हजाराचे कर्ज मिळलेल्या सर्व पथविक्रेत्यांसाठी केंद्र शासनाने 'स्वनिधी से समृद्धी' अभियान सुरु केले आहे. यामध्ये ज्या पथविक्रेत्यांनी अद्यापपर्यंत पीएम मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, पीएम सुरक्षा बिमा योजना, पीएम जीवन ज्योती बिमा योजना, पीएम जनधन योजना, एमश्रम योगी मानधन योजना, वन नेशन वन राशन कार्ड, इमारत व इतर बांधकाम कामगार या आठ योजनेचा लाभ घेतला नाही. त्यांनी आपल्या जवळ असलेल्या नाशिक मनपा विभागीय कार्यालय येथे जाऊन या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन माहिती भरून घ्यावी असे सांगण्यात आले आहे. या योजने अंतर्गत १० हजाराचे कर्ज बँकेमार्फत २०८८० पथविक्रेत्यांना रक्कम रुपये २० कोटी ८२ लाख रुपयेचे वितरण करण्यात आले आहे. दुसरा टप्प्यातील २० हजाराचे ५९१८ पथविक्रेत्यांना ११ कोटी ८३ लाख आणि तिसरा टप्प्याचे ३९४ पथविक्रेत्यांना १ कोटी ९७ लाख असे एकूण २७१९२ पथविक्रेत्यांना ३४ कोटी ६२ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे. पीएम स्वनिधी योजनेचे ऑनलाईन फॉर्म आपण राहत असलेल्या जवळच्या ग्राहक सेवा केंद्र किंवा मनपा विभागीय कार्यालय येथे जाऊन ऑनलाईन फॉर्म भरून बँकेत सादर करावा.

## मंत्री भुजबळ यांना मोबाईलवरून शिवीगाळ करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

नाशिक । प्रतिनिधी

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी काही दिवसांपूर्वी ब्राह्मण समाजाच्या बाबत वक्तव्य केले होते. याबाबत ब्राह्मण समाजाच्या वतीने त्यांचा या वक्तव्याच्या निषेध करण्यात आला होता. त्याच अनुषंगाने एका अनोळखी इसमाने सोमवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर मेसेज व व्हाट्सअप करुन शिवीगाळ गेली. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी अंबादास खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अनोळखी संशयिताविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राज्याचे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या मोबाईलवर सोमवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास एका अनोळखी व्यक्तीने ९४२२२२२०१२ या क्रमांकावरून त्यांच्या मोबाईलवर टेक्स मेसेज केला. त्यांनी सदरचा क्रमांक हा ब्लॉक केला असता परत वीस-पंचवीस मिनिटांनी त्यांना व्हाट्सअपवर कॉल करून शिवीगाळ केली. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी अंबादास खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात संशयिताविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस करत आहेत.



## युवासेनेतर्फे चंद्रयान मोहिमेच्या यशस्वीतेसाठी महापुजेचे आयोजन

नाशिक । प्रतिनिधी

भारताच्या चंद्रयान ३ आज चंद्राच्या पृष्ठभागावरील लँडिंग करत आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी नाशिकमध्ये काल युवासेनेच्या वतीने महापूजाव प्रार्थना करून गणपतीची आरती करण्यात आली.

याप्रसंगी युवासेना विस्तारक योगेश बेलदार, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शशिकांत कोठुळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल सूर्यवंशी, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, युवासेना महानगरप्रमुख दिगंबर नाडे, युवा नेते सचिन भोसले, शिवसेना उपमहानगर प्रमुख मनीष खेले, शिवसेना उप महानगर प्रमुख नाना काळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख विशाल खैरनार, युवा सेना जिल्हा समन्वयक राहुल वारुळे, भारतीय विद्यार्थी सेना महानगरप्रमुख शुभम पाटील, युवा सेना उप महानगर प्रमुख आकाश काळे आदी उपस्थित होते.

### चांद्रयान मोहिमेच्या यशस्वीतेसाठी क्षत्रिय समाज फाउंडेशनतर्फे हनुमान मंदिरात प्रार्थना

**नाशिक ।** चांद्रयान ३ मोहिमेच्या यशस्वीतेसाठी क्षत्रिय समाज फाउंडेशनच्या वतीने हनुमान मंदिरात पूजा करत प्रार्थना करण्यात आली. क्षत्रिय समाज फाउंडेशन नाशिकचे तेजपाल सिंह सोढा यांनी आपल्या सहकाऱ्यांसह हनुमान मंदीरात पंडित मिश्रा यांच्या हस्ते पूजन करत चांद्रयान ३ मोहिमेच्या यशस्वीतेसाठी प्रार्थना केली.


प्रोसेस जमा — ॲड. भवेश भ. वाघमारे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०२९/२०२३**

मनिषा भागवत पाटील (सुर्यवंशी) वगैरे ...**अर्जदार**
**विरुध्द**
**निरंक** ... **जाबदेणार**
भागवत भिमराव पाटील (सुर्यवंशी) ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ३ सो. धुळे यांचे कडे दि. २१/०८/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र. १०२९/२०२३ चा अर्ज भागवत भिमराव पाटील (सुर्यवंशी) यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकिय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयांतुन अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २६/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काहि वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कोर्ट नं ३ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थीत राहुन हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण: धुळे
दि. २२/०८/२०२३ — आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे**

ॲड.पी.एम.चौधरी
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश व.स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. १०२५/२०२३**

सौ. रंजनाबाई गंगाधर पाटील ऊर्फ सोनवणे ...**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही**
कै. प्रतिशाम गंगाधर सोनवणे (पाटील) ... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. न्यायाधीश व स्तर सो. यांच्या न्यायालयात दि. १९/०८/२०२३ रोजी दि.कि. अर्ज नं १०२५/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. प्रतिशाम गंगाधर सोनवणे (पाटील) यांचे वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ दि. ०९/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं.९.यांचे न्यायालयात उपरोक्त श्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक २२/८/२०२३ — आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** (शिक्का) **अधिक्षक, मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

प्रोसेस जमा — ॲड. एल. पी. पाटील, धुळे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथिल मे.दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं.१०१५/२०२३**

१.श्री. वसंत किसन जोशी
२.श्री. शरद किसन जोशी
दोन्ही रा. शिरधाने (प्र. डांगरी), ता. जि. धुळे,
३.कल्पना अशोक हिगमिरे
रा.राजीव गांधी नगर, कोर्टाच्या मागे, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक, ...**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ... **सा.वाला**
कै. किसन तानकू जोशी ... **मयत**

**कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी**
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत किसन तानकू जोशी यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश साो. क स्तर कोर्ट नं. १... यांचे कोर्टात दिनांक २९/०९/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत किसन तानकू जोशी यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. २१/०८/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे** (शिक्का) **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे**

प्रोसेस जमा — ॲड.श्री.दिपक डी. मोरे, साक्री
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मा. सह दिवाणी न्यायाधीश सो.कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज कं. २५१/२०२३**

गं.भा. इंदुबाई सुधाकर कोठावदे व इतर,
उ.व.-७५, धंदा-काहीनाही,
राहणार-नाशिक, ता.जि.नाशिक ...**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ... **जाबदेणार**

कै. सुधाकर बापु कोठावदे - मृत्यू दिनांक - २८/०३/२०२३

ज्याअर्थी वरील अर्जदार यांने मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ८ अन्वये (हेअरशिप सर्टीफिकेट) वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात अर्ज केलेला आहे, तसेच याकामी इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहीर नोटीस काढण्यात आली आहे. मयतांचे कायदेशिर वारस खालील प्रमाणे आहेत.

१. गं. भा. इंदुबाई सुधाकर कोठावदे, २. श्री. गजानन सुधाकर कोठावदे, ३.श्री. विजय सुधाकर कोठावदे, ४. सौ. मिना राजेंद्र बाविस्कर, ५. श्री. प्रदीप सुधाकर कोठावदे, ६. श्री. शरद सुधाकर कोठावदे

ज्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मयत कै. सुधाकर बापु कोठावदे यांच्या निधनानंतर त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन घोषित होवुन मिळणेसाठी व शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ मिळणेकामी, महसुल दफ्तरी व इतर अनुषंगीक कार्यालयांमध्ये आवश्यकता असल्याने वरील अर्जदारांचे व्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. सह. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर, साक्री यांचे न्यायालयात दिनांक - १८/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काही एक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

साक्री.
दिनांक - २३/०८/२०२३ — आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन, सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री. जि. धुळे** (शिक्का) **सहायक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री. जि. धुळे**

ॲड.प्रतिभा आर. मोरे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे.दिवाणी न्याया. सो (व.स्तर) यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं.१०३५/२०२३**

१) श्री. नामदेव गणेश पाठक उव-७७, धंदा:- सेवानिवृत्त
रा. २६, धर्मशांती नगर, नंदुरबार ता. जि. नंदुरबार पिनं ४२५४१२
२) श्री. प्रभाकर गणेश पाठक उव-७३ धंदा:- सेवानिवृत्त
रा. जनता पार्क प्लॉट नं १४०, घर नं ४८४ ता. नवापुर जि. नंदुरबार पिनं ४२५४१८
३) श्री. सुधाकर गणेश पाठक उव-६५, धंदा:- सेवानिवृत्त
रा. घर नं ४०८, लेन नं ६, श्रीराम कॉलनी जिजाई गार्डन जवळ, वारजे पुणे ता. हवेली जि. पुणे पिनं ४११०५८
४) सौ उषा वासुदेव भट उव- ६९, धंदा:- घरकाम
रा. ७४, राम नगर, वाडीभोकर रोड ता. जि. धुळे पिनं ४२४००१ ...**अर्जदार**
**विरुध्द**
१) कै. गणेश मनोहर पाठक
(मयत १८ डिसेंबर २०१७) ... **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे सह १ मुलगी व ३ मुले अर्जदार क १ ते ४ मुलं / मुली हयांचे वडील मयत असल्याने व पुर्वीच आई मयत असल्याने, त्यांचे वारस म्हणुन नाव लावणे कामी अर्ज हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम VIII हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे कामी अर्ज, हा त्यांचे ताबेउपभोगीतल मिळकत मौजे धुळे ता. जि. धुळे, महानगर पालीका हददीतील खालील मालमत्ता मयत वडील हे पोलीस खात्यातुन सेवा निवृत्त होते. वडीलांच्या नावाने असलेले धुळयातील घरावर सर्व वारस ज्यासी सि स नं ३१०६ एकुण क्षेत्र ४७९.४ चौ मी. पैकी क्षेत्र ८१० स्केअर फुट अर्थात ७५.२७ चौ. मी. असुन त्यासी प्लॉट नं ५०, क्षिरे कॉलनी, देवपुर ता. जि. धुळे वर वारसांची नाव लावणे आहे. सर्व अर्जदार यांचे नाव लावायाचे आहे. त्या बाबत दाखल केला आहे.

सदर प्रकरणात पुढिल तारीख ही ०६/१०/२०२३ अशी धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो (व. स्तर) हयांचे कोटीत कोर्ट नंबर यांचे समक्ष नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जा बाबत कोणाचाही कोणताही हरकत असल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे घेवुन वरील न्यायालयात सकाळी १०:३० वाजता त्यांचे म्हणणे मांडणे कामी हजर रहावे व म्हणणे मांडावे.

वरील दिवशी व वेळेस कोणीही हजर न झाल्यास, अर्जात कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवुन, अर्जात अर्जदार हयांचे लाभात एकतर्फी निकाल हा करण्यात येइल.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे.
धुळे
ता. २२/०८/२०२३ — आदेशावरुन,

**व.लि, मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर** (शिक्का) **अधिक्षक, मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर**

लक्ष महाराष्ट्र

गुरुवार, दि. २४ ऑगस्ट २०२३



## न्यूज कॉलम

### वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

धुळे । सुरत-नागपूर महामार्गावरील नेर (ता. धुळे) शिवारात भरधाव आयशरने पुढील ट्रकला जोरदार धडक दिली. त्यात ट्रकमधील तरुण ठार झाला. घटनेत सचिन रामभाऊ वानखेडे ठार झाला. अफसर शेख याने त्याच्या ताब्यातील आयशर (एमएच २०, ईजी ९७९४) मध्ये मिरची भरून धुळ्याकडे जात असताना भरधाव वाहन नेत पुढील ट्रकला धडक दिली. अफसर जखमी झाला. याबाबत मकताक रज्जाक शेख (रा. चिचोली) यांच्या फिर्यादीवरून अफसर भिकन शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला.

### शेतकऱ्याचा मृत्यू

**धुळे ।** शेत विहिरीतील मोटर सुरू करीत असताना विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू झाला. याबाबत शिंदखेडा पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. महेंद्र मगन पाटील (वय ४२, रा. कंचनपूर, ता. शिंदखेडा) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ते शेतात कपाशी पिकाला फवारणी करण्यासाठी गेले होते.

# आ.पटेल यांच्या हस्ते सहा गावांसाठी घंटा गाड्यांचे वितरण

**शिरपूर । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांच्या संकल्पनेतून सहा गावांसाठी घंटा गाड्यांचे वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांच्या संकल्पनेतून व १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत घंटागाडी (सन २०२२-२३) चे माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते व आमदार काशिराम पावरा यांच्या प्रमुख उपस्थितीत मांडळ, अजंदे खु., कळमसरे, उंटावद, हिंगोणी, सुभाषनगर या सहा गावांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण सहा घंटागाड्यांचे समारंभपूर्वक वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांच्या जिल्हा परिषद गटातील पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील व पंचायत समिती सदस्य यतिष सोनवणे यांच्या गणातील सहा गावांना तसेच जिल्हा परिषद सदस्य सखुबाई पारधी पवार यांच्या सुभाष नगर गावासाठी घंटागाडीचे वितरण जनक व्हीला आमदार कार्यालयात नुकतेच करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य सखुबाई पारधी, पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, पंचायत समिती सदस्य यतिष सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक आनंदसिंग राऊळ, पंचायत समिती माजी सभापती सत्तारसिंग पावरा, विजय पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मिलिंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक राजकपूर मराठे, भटू माळी, सुनील सोनवणे, राजेंद्र पाटील, राजधर माळी, शिरपूर शहरासह तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, लाभार्थी गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व अनेक मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी यावेळी कार्यक्रमात देवेंद्र पाटील यांच्या कामाबद्दल विशेष कौतुक करून शिरपूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत सरपंच व पदाधिकारी यांनी आदर्श कामकाज करण्याचे आवाहन यावेळी केले. गावाच्या स्वच्छते साठी घंटागाड्यांचा नियमित वापर करावा, सर्व ग्रामपंचायत आदर्श व्हाव्या, रोगराई पसरु देऊ नका. शिरपूर वरवाडे नगर परिषदेने सातत्याने नियमितपणे अतिशय चांगले कामकाज करून महाराष्ट्र राज्यात आदर्श नगरपालिका निर्माण केली. अनेकदा स्वच्छतेचे बक्षीस मिळवून शहरासाठी आपण चांगले काम केले. ग्रामीण भागातही सर्व पदाधिकाऱ्यांनी मनापासून लक्ष देऊन आपल्या गावाच्या विकासासाठी प्रयत्नशील असावे. लिंब व महत्वपूर्ण झाडे लावा, चांगले गाव तयार करा, लोकही आपल्या कामावर खूश व्हावे, म्हणजे कामाची चीज व्हावी, आरोग्य संभाळा असे आवाहन भाईंनी यावेळी केले.

आमदार काशिराम पावरा यांनीही मनोगत व्यक्त करून प्रत्येकाने आपल्या गावाचा विकास करण्याचे आवाहन केले. तालुक्याच्या विकासासाठी भाई व आम्ही कटिबद्ध असून सर्वांना सोबत घेऊन काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.



# मेरी मिट्टी मेरा देश अभियानांतर्गत देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील एच.आर.पटेल कन्या कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग याच्या संयुक्त विद्यमाने मेरी मिट्टी मेरा देश अभियानांतर्गत देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा १८ ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य आर.बी.पाटील व पर्यवेक्षक जे.पी. पाटील यांनी दीप प्रज्वलन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी आर. आर.रघुवंशी उपस्थित होते. प्रास्ताविक डी.यु.चौधरी यांनी केले. गीतगायन स्पर्धेत कला व विज्ञान शाखेतील २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे परीक्षण प्राचार्य आर.बी. पाटील यांनी केले. गीत गायन स्पर्धेत कराओके च्या मदतीने प्रथम क्र. पाटील देवयानी ज्ञानेश्वर, द्वितीय ठाकरे हर्षदा, तृतीय पवार धनश्री, उत्तेजनार्थ सोनवणे वर्षा हिरालाल या विद्यार्थिनी यशस्वी ठरल्या. तसेच विना कराओके प्रथम क्र. पटेल चंचल चुनीलाल, द्वितीय मराठी कविता संतोष, तृतीय गुजराती धारा भरत या विद्यार्थिनी यशस्वी झाल्या. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य आर.बी.पाटील यांनी मेरा मिट्टी मेरा देश या अभियानाची व्यापकता व्यक्त केली.

गीतगायन स्पर्धेत कला व विज्ञान शाखेतील २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

मनीषा पटेल, नीलिमा पाटील, शीला चौधरी, अरुण पाटील, झेड आर मंसूरी, गोकुळ पाटील, हेमंत तावडे, पंकज अहिरे, किशोर तायडे, संगीता पाटील, निलेश श्रीराव, रेखा साळुंखे, भारती पाटील टी.जी शेख, एन.ए.शेख, मीना पाटील, नीलिमा गिरासे, संध्या वळवी, मृणाल पाटील, अतुल जाधव, वर्षा मगर, प्रतिभा पाटील यांनी संयोजन केले.

# ॲड.ब्रविम महाले यांची एमपीएससीमार्फत सरकारी अभियोक्तापदी निवड

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या 'सहाय्यक सरकारी अभियोक्ता' या परीक्षेत धुळे जिल्हा न्यायालयातील ॲड.ब्रविम यशवंत महाले यांनी यश संपादन केले असून त्यांची 'सहाय्यक सरकारी अभियोक्ता महाराष्ट्र राज्य (वर्ग-१)' पदी निवड झाली आहे. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात त्यांनी हे यश संपादन केले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जानेवारी २०२२ मध्ये सहायक सरकारी अभियोक्ता गट - अ पदाकरीता जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार सप्टेंबर २०२२ मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यात प्राविण्य प्राप्त करणार्या उमेदवारांच्या मुलाखती मे २०२३ मध्ये पुणे येथील यशदा येथे एमपीएससी मार्फत घेण्यात आल्यात. दोन्ही टप्प्यांमध्ये यशस्वीपणे प्रावीण्य प्राप्त केल्यानंतर एमपीएससीने अंतिम गुणवत्ता यादी नुकतीच प्रसिध्द केली. त्यात धुळे जिल्हा न्यायालयातील ॲड. ब्रविम यशवंत महाले यांची सरकारी वकील अभियोक्ता पदी निवड केली असून शासनाकडे नियुक्तीसाठी तशी शिफारस केली आहे. ॲड. महाले यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबातील आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण जुने धुळे येथील न्यु सिटी हायस्कूल, तर माध्यमिक शिक्षण महाजन हायस्कूलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण एसएसव्हीपीएस कॉलेजमध्ये झाले. तर एम.ए.एलएल.बी चे शिक्षण देवपूर धुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज येथे पूर्ण केले. त्यानंतर सन २००६ मध्ये त्यांनी धुळे जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली. त्यासोबतच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणार्या सहायक सरकारी अभियोक्ता परीक्षेची तयारी सुरू होती. या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे. यात ॲड. महाले यांनी यश मिळविले.

# मतदार राजाला खुश करण्यासाठी शेतकऱ्यांचा बळी देऊ नका









### भारतीय किसान तर्फे निवेदन

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

भारतीय किसान संघातर्फे कांदा निर्यातीवर लादलेला ४०% निर्यातशुल्क, नेपाळ मधून टामट्याचे आयात,पन्नास लाख टन कापूस जातींची आयात, सोयापेंड ची आयात रशियाकडून गहू आयात यामुळे भारतातील शेतमाल कावडीमोल दराने जात असून शहरी व इतर वर्गातील मतदार राजाला खुश करण्याचे धोरण यामुळे शेतीव्यवसायचे कंबर मोडले असून शेतकरी दिवसेंदिवस कर्ज बाजरी होऊन आत्महत्या करीत आहेत म्हणून भारतीय किसान संघातर्फे देशभर निवेदन देऊन केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेला ४० % निर्यातशुल्क त्वरित मागे घ्यावे व देशात शेतमाल मुबलक प्रमाणात असून कोणताही शेतमाल बाहेरील देशातून आयात करू नये असे निवेदन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना भारतीय संघाचे प्रांत मंत्री सुभाष महाजन,जिल्हा अध्यक्ष साहेबचंद जैन व कार्यकर्त्यांनी निवेदन दिले. पिंपळनेर येथे भारतीय किसान संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रा शिवप्रसाद शेवाळे, तालुका मंत्री जगदीश सोनवणे, सह मंत्री प्रा डॉ सुरेश अहिरे, जिल्हा कार्यकारणी सदस्य डी डी महाले, धुळे जिल्हा महिला अध्यक्ष प्रमिला देवरे, महिला तालुका अध्यक्ष वैशाली कोरडे, पगारे, ए पी दसपुते, सुभाष जगताप, ग्रामप्रमुख धनराज पाटील, साहेबराव सोनवणे, निंबा साळुंखे, विजय बागुल, विशाल गांगुर्डे यांनी नायब तहसीलदार बी जे बहिराम यांना निवेदन दिले. साक्री येथे भारतीय किसान संघाचे तालुका अध्यक्ष मधुकर वाघ,तालुका उपाध्यक्ष शांताराम शिंदे,प्रदीप सोनवणे,राहुल गवळे, नामदेव गवळे, शंकर भदाणे,धनराज महाले यांनी साक्री तहसीलदार साहेबराव सोनवणे यांनी निवेदन दिले.

# होळ कृषी विद्यालयात गणवेश वाटप

**धुळे । प्रतिनिधी**



कृषी माध्यमिक विद्यालय, होळ ता. शिंदखेडा, जि.धुळे शाळेत इ.५वी च्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला खलाणे गावाचे रहिवासी उद्योजक रमेशजी बन्सीलाल टाटीया, हिराबाई उत्तम कोळी व शाळेचा माजी विद्यार्थी आसाम येथे आर्मी मध्ये कार्यरत असलेला जवान भावेश विलास पाटील हे मान्यवर उपस्थित होते. रमेशजी बन्सीलाल टाटीया यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे, वि. दा. करंदीकरांच्या या कवितेतील उक्तीप्रमाणे मान्यवरांनी आर्थिक मदत केली. रमेश टाटीया यांनी ५००० रुपये माजी विद्यार्थी राहुल सुभाष पाटील युनियन बँक दिघी गुजरात येथे मॅनेजर म्हणून नियुक्त असलेल्या तरुणाने आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ १० गणवेश सुरेश उत्तम कोळी यांनी १००० रुपये तसेच शाळेचे माजी विद्यार्थी २००४ ची इ. १० वी ची बेंच प्रतिनिधी म्हणुन भावेश विलास पाटील एकुण १५ विद्यार्थ्यांनी १५,००० रुपये देऊन विद्यार्थ्यांना शालेय गणवेशासाठी आर्थिक मदत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन छाया अरुण पाटील यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक डी. पी. शिसोदे यांनी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशासाठी जी आर्थिक मदत केली त्या सर्व दात्यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक प शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी आर.डी.बर्मा, सी. सी. ए. पाटील, डी.डी. पाटील, व्हि. एल. गवळी, जी. एल. वाल्हे, पी.ए.पाटील, वाय. बी. पाटील यांनी परिश्रम घेतले.

# शिवगर्जना ग्रुप चंपाबाग, पत्रकार कॉलनी मंडळाची गणेशोत्सव कार्यकारणी जाहिर

**धुळे । प्रतिनिधी**



शिवगर्जना ग्रुप चंपाबाग व पत्रकार कॉलनी मित्र मंडळ सालाबादप्रमाणे यंदाही गणेश उत्सव साजरा करीत आहे. यानिमित्त गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत सर्वानुमते गणेश उत्सवाचे कार्यकारणी निवड करण्यात आली. त्यात अध्यक्ष पदावर भरत भाऊ गोरे, उपाध्यक्ष - प्रफुल्ल जगताप, सचिव - पप्पू भाऊ बाविस्कर, सेक्रेटरी - प्रितेश अग्रवाल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सर्व नूतन कार्यकारिणीचे शिवगर्जना ग्रुपच्या वतीनी जाहीर अभिनंदन करण्यात आले. बैठकीला सर्वश्री दैनिक लक्ष महाराष्ट्रचे संपादक चंद्रशेखर पाटील, अनिल महाजन , राजेंद्र चिंचोले, राजेंद्र संन्यासी, संजय जडे, संजय शर्मा, संजय गुळवे, सोमनाथ बहालकर, प्रवीण घुगे, आशिष शर्मा, दीपक अहिरे, पप्पू वारकर, गणेश लंगोटे, सागर कासार, युवराज खरात, मिथुन कासार, अजिंक्य महाजन, प्रतीक रंधे , प्रसन्न काळे, रुपेश जडे, प्रेम संन्यासी उपस्थीत होते.

# माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त २५ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन

**शिरपूर । प्रतिनिधी**



एस. व्ही. के. एम. मुंबई जॉइंट प्रेसिडेंट, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त २५ ऑगस्ट २०२३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

एस. व्ही. के. एम. संचलित आयुर्वेद रुग्णालय शिरपूर द्वारा वाढदिवसा निमीत्त आयुर्वेद निदान व चिकित्सा शिबीर २५ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत केतकीबेन मुकेशभाई पटेल, सेंट्रल लायब्ररी, करवंद नाका, आमदार कार्यालय जवळ संपन्न होणार आहे. शिबीरात जुना खोकला व सर्दी, ह्रदयरोग लहान मुलांचे आजार, संधी विकार (संधीगत वात व आमवात), त्वचा विकार (सोरायसिस व एक्झीमा), आम्लपित्त व पचनसंस्थेचे विकार, मूळव्याध, मुतखडा व मुत्रपिंडाचे विकार, कंबरदुखी, प्रमेह, उच्च रक्तदाब, हाडांचा ठिसूळपणा, महिलांचे विकारांची चाचणी व औषधोपचार करण्यात येतील. तसेच ईसीजी, हिमोग्लोबीन, ब्लड शुगर, बी.एम.डी. (हाडांची तपासणी), एच. बी. ए. वन. सी. या चाचण्या करण्यात येतील व तपासणी नंतर मोफत आयुर्वेदीक औषधी दिली जातील. रुग्णांनी आजार संबंधी अगोदरची फाईल असल्यास सोबत आणावी. नोंदणी आमदार कार्यालय, करवंद रोड, शिरपूर येथे सुरु असून प्रथम येणाऱ्या फक्त ३०० रुग्णांची तपासणी व निदान करण्यात येणार आहे.

भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट शिरपूर व नारायण सेवा संस्थान उदयपूर (राजस्थान) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत अपंग (दिव्यांगजन) शस्त्रक्रिया, कृत्रिम अवयव, पोलिओ तपासणी व उपकरण वितरण शिबीर घेण्यात येत आहे. कृपया इच्छुकांनी https://sesrcp.in/yojana/camp/index.php या लिंक वर नोंदणी करावी. हे शिबिर आर. सी. पटेल मेन बिल्डिंग, 'राजगोपाल चंदुलाल भंडारी हॉल' शिरपूर येथे सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. त्यानंतर भोरखेडा येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ३६ सायकल वाटप तसेच वरुळ येथील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात शासनाकडून मिळालेल्या २५ सायकलचे वितरण करण्यात येणार आहे.

भूपेशभाई पटेल यांचे नुकतेच ऑपरेशन झाले असल्यामुळे फुलहार, पुष्पगुच्छ स्विकारले जाणार नाहीत. सुरक्षित अंतरावरुन सर्वांनी अभिष्टचिंतन शब्दसुमनांनीच करायचे आहे. हार, शाल, फुलासांठी वापरावयाचे पैसे आपले नांव लिहुन गुप्त पध्दतीने एका लिफापा द्वारे सत्कार पेटीत टाकावी. ती रक्कम गरजू लोकांच्या मदतीसाठी देण्यात येईल.

# अखेर कर्मयोगीनगरचा फलक पुन्हा लावला; शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचा जल्लोष

### फुले उधळून पेढे वाटले

**नाशिक । प्रतिनिधी**





राज्यातील सत्ताधारी गटाचा पदाधिकारी, माजी नगरसेवकाच्या दबावाखाली हटविलेला 'कर्मयोगीनगर' चा फलक अखेर महापालिकेने पुन्हा त्याच ठिकाणी लावला. प्रशासनाचे आभार मानत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने काल बुधवारी फुले उधळून, पेढे वाटून जल्लोष साजरा केला. यावेळी प्रभाग क्रमांक २४ मधील शेकडो नागरिक हजर होते.

महापालिकेच्या मान्यतेने, आरडी ग्रुपच्या सीएसआर फंडातून, शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनच्या आंदोलनाने व पाठपुराव्याने कर्मयोगीनगर येथे सेल्फी पॉईंट व जॉगिंग ट्रॅक साकारण्यात आला. सत्ताधारी गटाचा पदाधिकारी असलेल्या माजी नगरसेवकाने महापालिका प्रशासनावर दबाव टाकून या कामाची संकल्पना चोरताना श्रेयही स्वत:कडे घेतले. सोमवारी, १४ ऑगस्ट रोजी हुकुमशाहीने लोकार्पण घडवून आणले. याचवेळी कर्मयोगीनगर नावाचा फलक हटवून कर्मयोगीनगरची ओळखच पुसून टाकण्याचा प्रयत्न केला असा आरोप करण्यात आला. आठ दिवस होवूनही येथे हा फलक लागलाच नाही. हा फलक पुन्हा लावावा, अन्यथा जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या पुढाकाराने नागरिकांनी दिला होता. महापालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर आणि शहर अभियंता नितीन वंजारी यांना २१ ऑगस्ट रोजी याबाबतचे निवेदन देण्यात आले. प्रशासनाने त्वरित दखल घेत २२ रोजीच या ठिकाणी कर्मयोगीनगरचा फलक पुन्हा लावला. यावेळी सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, धवल खैरनार, संगिता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, विठ्ठल देवरे, विनोद पोळ, डॉ. शशिकांत मोरे, उज्ज्वला सोनजे, मीना टकले, प्रतिभा देशमुख, वंदना पाटील, बापूराव पाटील, ओमप्रकाश शर्मा, कृष्णाजी विसाळे, दिलीप निकम, बाळासाहेब देशमुख, नीलेश ठाकूर, चंद्रशेखर गोर्हे, अशोक सोनवणे, अरुण लांबट, माधव माळी, अशोक जाधव, डॉ. संजय महाजन, नानासाहेब जगताप, विजय पैठणकर, अशोक गाढवे, मगन तलवार, वसंत चौधरी, शिवाजी मेने, सचिन अमृतकर, योगेश नेरकर, योगेश पाखले, रवी भामरे, संदीप गहिवाड, सुनील नेरकर, दीपक जाधव, प्रदीप पिहुलकर, सुनील देशमुख, पांडुरंग जयसिंगघाग, सुनंदा बहिरट, शोभा सावकार, लताबाई भामरे, मंगला बच्छाव, संध्या शिंदे, मंदाकिनी सानप, शैला बागडे, उषा पैठणकर, रत्ना कोठावदे, मिनाक्षी पाटील, सुशीला पाटील, लता चौधरी, गोविंदनगर ज्येष्ठ नागरिक संघ, महिला हास्य क्लब, महिला योगा क्लबच्या पदाधिकारी यांच्यासह शेकडो नागरिक हजर होते. 'जय भवानी, जय शिवाजी', 'सत्कार्य फाउंडेशन, रहिवाशांच्या एकजुटीचा विजय असो'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## पाहिजेत

कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.

: संपर्क :

ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे

पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र






# छायाचित्रकार संघटनेचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द :मंत्री भुजबळ
























नाशिक । छायाचित्रकार संघटनेच्या असलेल्या विविध मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासन दरबारी पाठपुरावा करून सोडविण्यासाठी कटिबध्द असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. जागतिक छायाचित्रण दिनाच्या निमित्ताने कालिका मंदिर सभागृहात छायाचित्रकारांचा सन्मान मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते काल करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी छायाचित्रकार संघटनेचे अध्यक्ष संजय जगताप, नाईस डिजिटल प्रेसचे संजय चौधरी, प्रसिद्ध छायाचित्रकार चेतन मेहता, गीतांजली चौधरी, किशोर वाघ, अण्णा पाटील, दत्ता पाटील, सुनील जाधव, उपाध्यक्ष पंकज आहिरराव, सेक्रेटरी सुरेंद्र पगारे, सह सेक्रेटरी नंदु विसपुते, खजिनदार रविंद्र सुर्यवंशी, कार्यकारणी सदस्य प्रशांत तांबट, कैलास निरगुडे, धनराज पाटील, राज चौधरी, विलास पिंगळे, बापु तांबे, योगेश चव्हाण, किरण मुर्तडक, गिरीश भोळे, संघटक दिनेश वैष्णव, हेमंत कोठावदे, विलास आहिरे, सल्लागार प्रताप पाटील, विवेक नाईक, वामन दंदी, हारून शेख यांच्यासह पदाधिकारी व छायाचित्रकार उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, नव माध्यमांच्या विकासामुळे छायाचित्रांचे स्वरूप वेगाने बदलत चालले. मोबाईलचा वापर करून छायाचित्रण अधिक होत आहे. हजार शब्दातून जे लवकर व्यक्त होत नाही ते एका छायाचित्रातून व्यक्त होत असते. त्यामुळे छायाचित्राला अधिक महत्व आहे. कुठल्याची विषयाची व्यापकता समजण्यासाठी छायाचित्र हे अतिशय प्रभावी माध्यम आहे. या क्षेत्रात अनेक दिग्गज मंडळींनी योगदान दिलं असल्याचे सांगत आज जागतिक छायाचित्र दिनाच्या माध्यमातून छायाचित्रकारांचा सन्मान केला जात आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील : डॉ. गावित















धुळे । केंद्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्रस्तरावर प्रधानमंत्री मत्स्यसंवर्धन योजना राबविण्यात येत आहे. पारंपरिकरित्या मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना प्रशिक्षण देत आधुनिक पद्धतीने मत्स्य व्यवसाय करण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या माध्यमातून या व्यवसायिकांना उभारी देण्याचा प्रयत्न शासनामार्फत केला जात असल्याचे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी शिरपूर येथे केले. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तसेच प्रधानमंत्री मत्स्यसंवर्धन योजना, मत्स्य व्यवसाय नाशिक विभाग व आवलामाता प्राथमिक भूजलाशयीन मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मत्स्य व्यवसाय साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नंदुरबार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, खासदार डॉ. हिना गावित, धुळे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, राहुल रंधे, जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, मत्स्य व्यवसाय विभागाचे उपायुक्त एस पी वाटेगावकर, धुळे जिल्हा मत्स्यव्यवसाय अधिकारी अविनाश गायकवाड तसेच अवलामाता प्राथमिक भूजलाशयीन मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण शिरसाट, मार्केट कमिटीचे मिलिंद पाटील, सरपंच दिगंबर पाटील,उपसरपंच राहुल रंधे, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ